संदर्भ: लोकसत्ता आवृत्ती : मुंबई दि. ३० डिसेंबर २०१८ पान नं. ५

# राज्यसेवा पूर्व परीक्षेच्या पदसंख्येत वाढ

## ऑनलाइन अर्जांसाठी ४ जानेवारीपर्यंत मुदत

प्रतिनिधी, पुणे

**महाराष्ट्र लोकसेवा** आयोगाने (एमपीएससी) राज्यसेवा पूर्व परीक्षेसाठी प्रसिद्ध केलेल्या पदसंख्येत वाढ केली आहे. आता ही परीक्षा ३६० जागांसाठी होणार असून, विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्यासाठी ४ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

एमपीएससीकडून १७ फेब्रुवारीला राज्यातील सर्व जिल्ह्याच्या ठिकाणी गट अ आणि गट ब पदांसाठी राज्यसेवा पूर्व परीक्षा घेतली जाणार आहे. एमपीएससीच्या सुधारित जाहिरातीनुसार उपजिल्हाधिकारी पदासाठी ४० जागा, पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त पदासाठी ३१ जागा, सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा पदासाठी १६ जागा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पदासाठी २१ जागा, तहसीलदार पदाच्या ७७ जागा, उपशिक्षणाधिकारी अथवा महाराष्ट्र शिक्षण सेवा पदाच्या २५ जागा, कक्ष अधिकारी १६ जागा, सहायक गट विकास ११ जागा, नायब तहसीलदार ११३ जागा या पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. एकूण ३६० पदांसाठी ही भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. पूर्व परीक्षा १७ फेब्रुवारी २०१९ रोजी, तर मुख्य परीक्षा १३, १४ आणि १५ जुलै २०१९ रोजी घेण्यात येणार आहे.